*रोटरी क्लब साऊथ मुंबई तर्फे आउटस्टॅडींग मेरीटोरीअस अचीव्हमेंट अवार्डने अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार सन्मानीत*
==============================================================

रोटरी क्लब साऊथ मुंबई तर्फे यावर्षीचा आउटस्टॅडींग मेरीटोरीअस अचीव्हमेंट अवार्ड अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना प्रदान करण्यात आला आहे. 30 मार्च रोजी मुंबई क्रिकेट असोसिएशन परिसरात आयोजित एका कार्यक्रमात अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. या पुरस्काराने त्यांच्या यशोप्रवासात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक विकासात उल्लेखनिय योगदान दिल्याबद्दल हा पुरस्कार अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना प्रदान करण्यात आला. यावेळी पद्मश्री प्रो. केईकी मेहता, शशीकुमार शर्मा , नर्गीस कौर आदी मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती. पुरस्काराने नवी उमेद व उर्जा प्राप्त होते. रोटरी क्लब साऊथ मुंबईने दिलेला या पुरस्काराबद्दल मी त्यांचा आभारी असुन भविष्यातही उत्तोमत्तम काम करण्याचा व त्या माध्यमातुन महाराष्ट्राच्या विकासात माझ्या परीने योगदान देण्याचा मी प्रयत्न करेन असे यावेळी बोलतांना अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

या आधिही अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना विविध प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले आहे. 1998 साली राष्ट्रकुल संसदीय मंडळा तर्फे विधानसभेतील उत्कृष्ठ आमदार पुरस्कार, अंध व दिव्यांगांच्या क्षेत्रात उल्लेखनिय कामगीरी केल्याबद्दल सन 2001 मध्ये राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र शाखे तर्फे लेफ्ट. जनरल जी.एल. नर्डेकर स्मृती पुरस्कार, आफ्टरनुन व्हॉईस या वृत्तसंस्थे तर्फे बेस्ट परफॉर्मिंग मिनिस्टर पुरस्कार, जे.सी.आय. मुंबई तर्फे मॅन ऑफ द इयर पुरस्कार, आर्थिक क्षेत्रात महाराष्ट्राने केलेल्या उल्लेखनिय कामगीरी बद्दल अर्थमंत्री म्हणुन इंडिया टुडे समुहातर्फे सन्मान, विक्रमी वृक्ष लागवड केल्याबद्दल किर्लोस्कर वसुंधरा सन्मान पुरस्कार, लोकसेवा आणि विकास संस्थेद्वारे कर्मवीर दादासाहेब कन्नमवार स्मृती पुरस्कार, लोकमत समुहातर्फे महाराष्ट्रीयन ऑफ द इयर हा पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानीत करण्यात आले आहे. त्यांच्या नेतृत्वात वनविभागाने केलेल्या विक्रमी वृक्षलागवडीचे कौतुक पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी मन की बात या कार्यक्रमात केले आहे. महाराष्ट्रातील विक्रमी वृक्ष लागवडीची दखल लिमका बुक ऑफ रेकॉर्डसने घेतली आहे. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या यशोप्रवासात रोटरी क्लब साऊथ मुंबई तर्फे देण्यात आलेल्या या पुरस्काराने आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.